## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 27/02/2020 (गुरूवार)
## (सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 7 किमी अंतरावर मौजा करवई शिवार येथे दिनांक 26/02/2020 चे 10.00 वा. ते 11.00 वा. दरम्यान एमच–33/व्ही–0391 क्रमांकाचा ट्रॅक्टरचा व एमएच– 40एल– 8176 क्रमांकाच्या ट्रॉलीचा चालक आरोपी नामे– रामनिवास हिरू पारखी, रा. रयतवाडी वडम्बा व विना क्रमांकाचा आयशर 480 कंपनीचा ट्रॅक्टर चा चालक आरोपी नामे– 2) चेतन गोकुलदास कोकोडे, रा. करवई या दोन्ही आरोपीतांनी त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या प्रत्येकी 2 ब्रास रेती किं. 2,000/– रू. रेती असा एकुण दोन्ही वाहनात 4 ब्रास रेती कि. 4,000/–रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 6, 6,0,4000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक सतिष नागपूरे पो. स्टे. देवलापार यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहा. पोलिस निरीक्षक श्री प्रवीण बोरकुटे 9545667223 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर पेठबुधवार काटोल येथे दिनांक 25/02/2020 ते दिनांक 26/02/2020 पर्यंत फिर्यादी नामे– कैलास सितारामजी राजुरकर, वय 50 वर्ष, रा. पेठबुधवार काटोल यांच्या फल्लीमार्केट येथिल पानठेल्याचे अज्ञात आरोपीने साईडचा लॉक तोडुन आतमधील बिडी पॅकेट, सिगरेट पॅकेट, अगरबत्ती पुडे सुपारी पॅकेट व नगदी 3,020/–रू. असा एकुण कि. 8,720/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. तसेच राजु रावाजी अडागळे यांच्या पानठेल्याचे अज्ञात आरोपीने साईड गेट तोडुन आतमधील बिडया सिगरेट पॅकेट आमपाचक पॅकेट ठवकर पुडी असा एकुण 4,460/–रू. व नगदी 2,000/–रू. असा एकुण 6,460/–रू. तसेच अमृत कोठीराम चरडे यांचे पानठेल्याचे साईड गेट तोडुन चार्जिंग बॅटरी, सिगरेट पॅकेट, असा एकुण 1,500/–रू. चा माल व नगदी 1,500/–रू. असा एकुण 3,000/–रू. चा माल तसेच शिवनारायण हरिशसींग कुशवाह यांचा विवो कंपनीचा मोबाईल कि. 12,200/–रू. अज्ञात चोराने चोरून नेले. असा एकुण कि. 30,380/–रू चा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण 9545363221 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 20 कि.मी. अंतरावरील महालगाव एनएच 53 रोडवर दिनांक 26/02/2020 चे 02:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पुरूषोत्तम केशवराव उपरे, वय 42 वर्ष, रा. बुटीबोरी, जि. नागपूर यांचे एमएच– 40/बीजी– 1571 क्रमांकाचा आयसर ट्रकचा चालक आरोपी मृतक नामे– सुनिल रामचंद्र शहारे, रा. सातगाव व क्लीनर मोहनिस युवराज भैसारे वय 29 वर्ष, रा. लाखनी जि. भंडारा हे आयसर गाडीने भंडारा कडुन नागपूर कडे जात होते. दरम्यान एमएच– 40/बीजी– 1571 क्रमांकाचा आयसर ट्रकचा चालक आरोपीने सीजी– 04/जेसी– 7797 क्रमांकाच्या ट्रकचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन सार्वजनीक रोडवर धोकादायक स्थितीत उभे ठेवल्याने आयसर गाडीच्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन धडक दिली. या अपघातात मोहनिस युवराज भैसारे, वय 21 वर्ष, रा. लाखनी जि. भंडारा हा स्टेअरिंग मध्ये दबुन मरण पावला व आयसर गाडीचा चालक जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 283, 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार काळे 9822549695 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर